# उल्लेखनिय कामगिरीबाबत

## रे.पो.स्टे. इतवारी गु.र.क्र. 02/16 कलम 379 भा.द.वि.

दिनांक 25/01/2016 रोजी फिर्यादि नामे राजेन्द्र परसराम तिवारी वय 45 धंदा. ॲटोडील राह. नागपूर सहकारी बॅकेच्यावर कामठी, जि. नागपूर हे रे.स्टे. कामठी येथे आपल्या नातेवाईकांना रायप्र पॅसेन्जर गाडीमध्ये बसविण्याकरीता रे.स्टे. कामठी येथे आले व रे.स्टे. कामठी येथे तिकिट बुकिंग खिडकी जवळ प्रवासाचे तिकीट काढीत असतांना प्रवासी लोकांचा गर्दीचा फायदा घेवून एक मुलगा वय अंदाजे 25 वर्ष अंगात पाढंरा शर्ट काळी पॅन्ट घातलेला काळया सावळया इसमाने फिर्यादी याची नजर चुकवून त्यांचे शर्टच्या वरच्या खिश्यातील रोख 2200/– रू. चोरून घेवून कामठी रे.स्टे. येथील सायकल स्टॅन्ड कडे पळून गेला त्यावरून फिर्यादी हे रे.पो.चौकी कामठी येथे आले व सदर चोरी बाबत सागितले असता तेथे डयुटीवर असणारे पोहवा/897 मेहरे यांनी रेकॉर्ड वरील गुन्हेगारांची फोटो दाखविले असता सदर फोटो पाहून उमेश माणिक रामटेके रा. कामठी यास ओळखून याच इसमाने माझे पैसे चोरून नेले असे सागुण रे.पो.चौकी कामठी येथे चोरीची फिर्याद दिल्याने गु.र.क्र. 02/16 कलम 379 भादवि प्रमाणे दाखल केला. व सदर गुन्हयाचे कागदपत्र रे. पो.स्टे. इतवारी येथे आणून हजर केल्याने पो.स्टे.ला गु.र.क्र. 02/16 कलम 379 भा.द.वि प्रमाणे दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास मा. प्रभारी अधिकारी यांच्या आदेशान्वये पोहवा/897 मेहरे यांना देण्यात आला व प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली एक तपास पथक तयार करून सदर तपास पथकामधील पोउपनि/पाटील, पोहवा/897 मेहरे, पोहवा/645 पेन्दाम, पोशि/601 यादव, पोशि/1058 भोयर पोशि/1162 जाधव मपोशि/800 रामटेके यांना सरकरी वाहनाने वाहनचालकासह कामठी येथे राहणा–या उमेश माणिक रामटेके यांचे राहते घरी पाठविले. सदर परीसरात तेथील रहोवासी यांना नमुद इसमाबाबत विचारले असता सदर इसम हा कामठी येथे राहतो व तो घरी आहे यांची खात्री झाल्याने सर्व पो. स्टॉफ यांनी त्यांच्या घरी जावून त्यास विचारपूस केली असता दि. 25/01/2016 रोजी सदरचा गुन्हा हा त्यानेच केला अशी कबुली दिल्याने त्यास पो. स्टॉफ सह गुन्हयातील चोरीस गेलेला माल हस्तगत करून त्यास पो. स्टॉफच्या मदतीने पकडून पो.स्टे. ला आणले. व दि. 25/01/2016 चे 16:35वा सदर गुन्हयात अटक करण्यात आली

नमुद गुन्हयाच्या तपासात आरोपीकडून रोख रू. 2200/– रू. जप्तीपत्रकाप्रमाण दोन पंचा समक्ष जप्त करण्यात आले व सदर गुन्हयाच्या तपासात अवघ्या 3 तासात आरोपीस अटक करून अटक आरोपी विरूध्द दोषारोप पत्र तयार करून मा. हु कोर्टात कोर्ट मोहरर मपोना/671 तोडासे यांनी दोषारोपपत्र दाखल केले सदर गुन्हयाचा तपास मा. प्रभारी अधिकारी श्री. नितीन वडते यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार पोहवा/897 यांनी व पो.स्टॉफ पोउपनि/ पाटील, पोहवा/645 पेन्दाम, पोना/428 येडेकर, पोशि/601 यादव, पोशि/1058 भोयर, पाशि/1142 घुरडे, पोशि/1162 जाधव, मपोशि/800 रामटेके, मपोशि/984 कढे, वाहनचालक पोशि/787 पांडे यांनी गुन्हा उघडकीस आणण्यास योगदान दिले.

कामठी हे रे.पो.स्टे. इतवारी येथील अती संवेदनशिल ठिकाण असून सदर ठिकाणी असून येथे दहशतीचे वातावरण नेहमीच निर्माण होते व रेल्वे पोलीसांवर या बाबत असंतोष व्यक्त होत असतो. तरी येथील सामान्य रहिवाशी वर्गाने रेल्वे पोलीसांच्या या कामगीरीचे कौतूक केले आहे.